सकाळ TODAY

लैंगिक अत्याचार प्रकरणी गुन्हा दाखल

देऊळगाव राजा: शहरातील एका कुटुंबात घडलेल्या गंभीर अत्याचार प्रकरणी पोलिसांनी १३ जणांविरुद्ध गुन्हे नोंदवले आहेत. या घटनेत पीडित महिला व अल्पवयीन बालक यांची ओळख गोपनीय ठेवण्यात आली आहे. संबंधित महिलेच्या तक्रारीवरून पतीवर अल्पवयीन बालकाशी अयोग्य वर्तन केल्याचा, तसेच पत्नीवर तिच्या इच्छेविरुद्ध अत्याचार केल्याचा आरोप आहे.

प्रत्येक धर्म हा पवित्र असून सत्यदर्शन सर्व धर्मांचा सार

स्वामी हरिचैतन्यानन्द सरस्वती: लाखो भक्तांच्या उपस्थितीत गुरुदेव आश्रमाचा सोहळा

■ सकाळ वृत्तसेवा

शेलसूर, ता.२० : प्रत्येक धर्म हा पवित्र असून सत्यदर्शन हाच प्रत्येक धर्माचा सार आहे, असे प्रतिपादन स्वामी हरि चैतन्यानन्द सरस्वती महाराज यांनी श्री गुरूदेव आश्रमाच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित सप्ताहाची सांगता समारंभात बोलता केले. यावेळी केंद्रीय आयुष्य राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव, मुख्यमंत्र्यांचे स्वीय सहाय्यक विद्याधर महाले, आ. संजय गायकवाड, आ. मनोज कायंदे, माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

यावेळी काल्याच्या कीर्तनातून महाराजांनी समाजातील अनेक वाईट चाली रीतिवर प्रहार करून समाज प्रबोधन केले. यावेळी प्रामुख्याने नगराध्यक्ष किशोर गरोळे, माजी जि.प. अध्यक्ष प्रा. नरेंद्र खेडेकर, शेतकरी नेते रविकांत तुपकर, हिरकणी महिला अर्बनच्या वृषाली बोन्द्रे, उबाठाचे जिल्हा प्रमुख जालिंदर बुधवत, श.प. राष्ट्रवादी गटाचे जिल्हा प्रमुख नरेश शेळके, करवंड महोत्सव समितीचे अध्यक्ष अरविंद देशमुख यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

सध्याच्या राजकीय व सामाजिक परिस्थितीचा संदर्भ देत त्यांनी कोणताही धर्म वाईट नसून प्रत्येक धर्मात चांगल्या गोष्टीचा मार्ग सांगितला असून मानव कल्याण हाच प्रत्येक धर्माचा अंतिम उद्देश असल्याचे सांगून प्रत्येकाने बंधूभाव जपणे हेच राष्ट्रकार्य असल्याचे त्यांनी नमूद केले. दरवर्षी गुरुदेव आश्रमात होणारा हा काला म्हणजेच सामाजिक एकता बंधूभावाचे प्रतीक असल्याचे त्यांनी शेवटी नमूद केले. यावेळी केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी मनोगत व्यक्त करताना आश्रमाच्या गेल्या तीस वर्षांतील सेवाकार्याचे कौतुक करून स्वामीजीच्या त्याग व समर्पनाचे कौतुक केले.

शेलसूर: कीर्तनातून प्रबोदन करताना स्वामी हरिचैतन्यानन्द सरस्वती महाराज व कार्यक्रमाला हजारोच्या संख्येत उपस्थित मान्यवर व भाविक.

लाखो भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

■ यावर्षी ढगाळ वातावरण असल्यामुळे तसेच काल झालेल्या गारपिटीमुळे महोत्सवाच्या आनंदामध्ये थोडेसे विरंजन पडले असले तरी भक्तांचा उत्साह मात्र ओसंडून वाहताना दिसत होता. दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी महाप्रग महाप्रसादासाठी भक्तांनी मोठ्या प्रमाणात लाखोंच्या संख्येत आश्रमावर गर्दी केली होती. यावेळी आश्रमाच्या वतीने ५१ क्विंटल धान्यापासून बनलेल्या पुरी आणि भाजीचा महाप्रसाद भक्तांना शिस्तबद्धपणे वितरित करण्यात आला. महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री गुरुदेव आश्रम विश्वस्थ मंडळ तसेच शेळगाव देशमुख, पळसखेड, शेलसूर ,कव्हळा,धोत्रा भांगोजी, करवंड, डोंगर खंडाळा, डोंगर शेवली, धोडप या गावच्या भक्तांनी सहकार्य केले.

आश्रमासाठी अनेकांचा मदतीचा हात

■ श्री गुरुदेव आश्रम बास्केट सपकाळ द्वारा चालवल्या जाणाऱ्या विविध सेवा व भक्तांसाठी उभारण्यात येणाऱ्या भक्तनिवास व सभागृहाच्या बांधकामासाठी आमदार श्वेता महाले यांच्याकडून तीन कोटी रुपये तसेच बुलढाणा विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजय गायकवाड यांच्याकडून एक कोटी रुपयांचा निधी देण्याची घोषणा करण्यात आली.

अवतीभवती

विनयभंग प्रकरणी वृद्धाविरुद्ध पोक्सो

बुलडाणा: शहरात पालकांच्या सतर्कतेमुळे अल्पवयीन मुलीच्या विनयभंगाचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. ७० वर्षीय वृद्धाविरुद्ध पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राप्त माहितीनुसार, आरोपी शंकर मंगतानी (वय ७०), बुलडाण्यातील एक व्यापारी असून त्याचे पीडित मुली व त्याच्या घरच्यांच्या ओळखी आहे. याचा फायदा घेत आरोपीने मुलगी एकटी असताना तिच्याशी अश्लील वर्तन करत विनयभंग केल्याचा आरोप आहे. त्यानंतर पीडित मुलीनेही हा प्रकार आपल्या पालकांना सांगितला आणि कुटुंबीयांनी पोलिस स्टेशन गाठून तक्रार दिली. या गंभीर प्रकरणात पोलिसांनी विविध कलमासह पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

उपोषणानंतरही अवैध रेती उपसा सुरूच

दुसरबीड : येथील रेती घाट सुरुवातीपासूनच वादाच्या भोवऱ्यात अडकला असून नियमांना बगल देत रेती उपसा सुरू असल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे. बोट व पोकलेनच्या सहाय्याने होत असलेल्या उपशाविरोधात तक्रारी करूनही दखल न घेतल्याने राहेरी बुद्रुक येथील शेतकऱ्यांनी उपोषणाचा मार्ग अवलंबला होता. सुमारे २० दिवसांनंतर १७ मार्च रोजी तहसीलदार अजित दिवटे यांनी उपोषणकर्त्यांशी चर्चा करून त्यांच्या मागण्या मान्य केल्या. मात्र उपोषण संपल्यानंतर अवघ्या दुसऱ्याच दिवशी नदीपात्रात तीन पोकलेन मशीन लावून दिवस-रात्र रेती उपसा सुरू करण्यात आला.

वीज चोरी करणाऱ्या सहा ग्राहकांवर कारवाई

देऊळगावराजा : विद्युत मीटरमध्ये विविध शकली करून वीज चोरी करणाऱ्या शहरातील सहा ग्राहकांवर महावितरणच्या विशेष पथकाने कारवाई केली असून ६ लाख २० हजाराचा दंड धुडावला आहे. आधुनिक यंत्राद्वारे तपासणी केलेल्या शहरातील सहा वीज ग्राहकांचे विजेची चोरी करणारे विद्युत मीटर जप्त करण्यात आले. तसेच वीज चोरी होत असलेल्या ग्राहकांचे विद्युत कनेक्शन खंडित करण्यात आले आहे. विशेष पथकाकडून चोरी करणाऱ्यांवर नियमानुसार दंड आकरण्यात आला आहे. ज्यामध्ये गणेश पुंजाजी दराडे २२ हजार ३४०, गुड्डू खान बगघु खान ७६ हजार ६० रुपय, विठ्ठल विनायक सावळे ९९ हजार ८००, शेख वाहेद शेख बिस्मिल्ला ६१ हजार ७५०, विनोद रामभाऊ खराट ९३ हजार ६३० रुपये आणि कपिल तरेश रूपरेलिया २ लाख १५ हजार ६२० असा एकूण सहा लाख २० हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.

श्री शारंगधर बालाजी चरणी फळांची आरास

भाविकाची मंदिरात मांदीयाळी: परंपारीक पद्धतीने गुढीपाडवा साजरा

मेहकर, ता. २० : नूतन वर्षाचे स्वागत आणि साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या गुढीपाडव्याचा उत्साह आज सर्वत्र पाहायला मिळाला. याच शुभमुहूर्तावर मेहकर नगरीचे वैभव आणि जगप्रसिद्ध तीर्थक्षेत्र असलेल्या श्री शारंगधर बालाजी मंदिरात फळांची भव्य आणि आकर्षक आरास करण्यात आली होती. प्रभू शारंगधरचे हे मनमोहक रूप डोळ्यात साठवण्यासाठी आज दिवसभर भाविकांनी मंदिरात येऊन दर्शन घेतले.

मेहकरच्या श्री शारंगधर बालाजी चे नाव आज जगभरात पोहोचलेले असून, दररोज भक्त दर्शनासाठी येत असतात. कोणत्याही मोठ्या सणाचे औचित्य साधून मंदिरात विशेष सजावट करण्याची परंपरा आहे. आज गुढीपाडव्यानिमित्त गाभाऱ्यात विविध प्रकारच्या फळांची कलात्मक आरास करण्यात आली होती. तसेच, पुजारी मंडळींनी श्री शारंगधर बालाजीला अत्यंत आकर्षक आणि भरजरी पोषाख परिधान केला होता. फळांची सजावट आणि देवाचा तेजस्वी अवतार यामुळे मंदिराचा परिसर चैतन्यमयी झाला होता.

हिंदू नववर्षाच्या पहिल्या दिवशी देवाचे दर्शन घेण्यासाठी भक्त मंडळी सकाळपासून रात्रीपर्यंत येत होती. मंदिराच्या गाभाऱ्यात केलेली फळांची आरास भाविकांच्या आकर्षणाचे मुख्य केंद्र ठरली.

'शारंगधर बालाजीच्या दर्शनाने मनाला शांती मिळते आणि आजची ही सजावट पाहून डोळ्यांचे पारणे फिटले,' अशी भावना अनेक दर्शनार्थींनी व्यक्त केली. मंदिर प्रशासनाकडून आणि पुजारी मंडळींकडून गुढीपाडव्याचे छान नियोजन करण्यात आले होते.

मेहकर: श्री शारंगधर बालाजी मंदिरात केलेली फळांची आकर्षक आरास.

बालाजी संस्थान येथे गुढीपाडवा सरस्वती पूजन

देऊळगाव राजा : मराठी नववर्ष गुढी पाडव्याच्या दिवशी मुहूर्ताप्रमाणे श्री बालाजी महाराज संस्थान कार्यालयात विधिवत सरस्वती पूजन भक्ती भावाने पार पडले. श्री बालाजी संस्थान वंशज पारंपरिक विश्वस्त राजे विजयसिंह जाधव, धर्माधिकारी टाकळकर व व्यवस्थापक कि.द. बीडकर यांच्या हस्ते संस्थानचे खातेबुक व पंचांगाचे विधीवत पूजन होऊन आरती झाली. त्यानंतर ब्रम्हवृंद यांनी पंचांग वाचन केले. तसेच चैत्र शु.१ रोजी सुरू होणारे नववर्ष शालिवाहन शके १९४८ सर्व जनतेस सुखसमाधानाचे जावो, अशी श्री बालाजी चरणी प्रार्थना करण्यात आली.

देऊळगाव राजा: सरस्वती पूजन करताना मान्यवर.

ट्रॅक्टरवरून पडून युवक ठार

मलकापूर पांग्रा, ता. २० : सिंदखेड राजा तालुक्यातील मलकापूर पांगरा येथे धावत्या ट्रॅक्टरवर उभ्या असलेल्या युवकाचा तोल जाऊन तो थेट चाकाखाली सापडल्याची धक्कादायक घटना आज १९ मार्च रोजी पंडित नेहरू विद्यालयासमोरील पुलाजवळ ही घटना घडली. या भीषण अपघातात युवक ठार झाला. समाधान दळवी (वय ३५), रा. भुमराळा असे मृतकाचे नाव आहे.

भुमराळा येथील विनानंबर नवीन फार्म ट्रॅक कंपनीचा ट्रॅक्टर पेन सांगवीकडे जात होता. ट्रॅक्टर चालकाच्या बाजूला उभा असलेला समाधान दळवी (वय ३५), रा.भुमराळा याचा अचानक तोल गेला आणि तो मधल्या टायरखाली सापडत फरफटत गेला.

तहसीलदारांकडून विहिरीची पाहणी, पुरवठा सुरू करण्याचे दिले निर्देश

सैलानी, ता. २० : रायपूर येथील तीव्र पाणीटंचाईमुळे त्रस्त झालेल्या ग्रामस्थांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाने अखेर हालचाल करत गुरुवारी (ता. १९) पळसखेड धरणाजवळील विहिरीची पाहणी केली. तहसीलदार विठ्ठल कुमरे आणि जलसंधारण विभागाचे उपविभागीय अधिकारी मनीष गवळी यांनी शिंदेसेनेचे संदीप गायकवाड यांच्या मागणीवरून ग्रामस्थांच्या उपस्थितीत प्रत्यक्ष पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला.

पळसखेड येथील गजानन चिंचोले यांच्या विहिरीवरून अनेक वर्षांपासून रायपूरला पाणीपुरवठा सुरू होता. मात्र, ग्रामपंचायतीकडील थकीत मोबदला आणि वाढीव दराच्या मागणीमुळे हा पुरवठा गेल्या काही महिन्यांपासून बंद झाला. परिणामी, ग्रामस्थांना दोन-दोन महिने पिण्याच्या पाण्यासाठी प्रतीक्षा करावी लागत असून नागरिकांमध्ये संताप वाढला होता. कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी प्रशासनाने हालचाली सुरू केल्या असून, संदीप गायकवाड यांच्या मध्यस्थिने हा प्रश्न निकाली निघण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

यावेळी विष्णू इंगळे, मो. सज्जाद मो. हकीम, शमीम सौदागर, ज्ञानदेव सोनुने, आसिफ सौदागर, निलेश राजपूत, अनुप अहीर, बालाप्रसाद जैस्वाल, रमेश गवते आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

सैलानी: विहिरीची पाहणी करताना तहसीलदार विठ्ठल कुमरे व इतर.

SHRI CHHATRAPATI SAHAKARI SAKHAR KARKHANA LTD.
BHAVANINAGAR, TAL-INDAPUR, DIST- PUNE- 413104 (MH)
e-mail- scssklb.act@gmail.com, scssklb@gmail.com
Telephone No. : 02118-266231
Website : www.shrichhatrapatisugar.com

TENDER NOTICE FOR EXPORT OF WHITE SUGAR

Sealed tender are invited for Export of White Sugar as per Govt. of India Letter F.No.1(4)/2025-SP Dt.16/03/2026 from the authorized sugar exporters/broker/export quota holder sugar factory, sugar specification as below.

1	White Sugar	10000 MT Season 2025-2026 (own quota)
2	Icumsa White	Below 100 by Method No.10
3	Rate	To be quoted Ex-Factory
4	Deposit	Rs. 1000/- Per MT
5	Payment	Before Delivery by RTGS
6	Inspection	To be buyers account
7	Packing	50kg PP bags
8	Delivery	Ex-Karkhana
9	Subsidy	Any subsidy announced by state & central Gov. will be on account of sugar factory.

Other Terms & Conditions for Exporters :
1) 1. Exporter/Merchant exporter having an IEC code no, RCMC/DGFT & GST Certificate.
2. GST "No Default Certificate" is essential
3. Exporter should mention the name of destination country.
2) Submit the tender on or before 26-03-2026 At 3.00 pm Factory side by E-mail/post and by hand.
3) All terms and conditions under Govt. Notification Dt. 16-03-2026 Exchange offer scheme binding on exporter.
4) The karkhana reserves the right to accept or reject partly or full tender without assigning any reason thereof.

H.N. KARWAR, Gen. Manager | A.B. JADHAV, Managing Director | K.R. GAWADE, Vice Chairman | P.S. JACHAK, Chairman

पंजाब नैशनल बैंक (भारत सरकारचा उपक्रम) pnb punjab national bank (A Govt. of India Undertaking)

एआरएमबी, नाशिक
शॉप नं.2 व 3 मेझनाईन मजला, स्नेह हाईट अपार्टमेंट, इंदिरा नगर, नाशिक - 422009. फोन : 0253- 2323020, ईमेल- cs8288@pnb.bank.in

सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 मधील नियम 8 व 9 अन्वये तमाम लोकांकरीता ई-लिलाव विक्री नोटीस

स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री करण्याकरीता ई-लिलाव विक्री नोटीस
(सरफेसी कायदा, 2002 मधील नियम 8(6) अन्वये वैधानिक विक्री नोटीस)

सेक्युरिआयझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट ॲन्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टरेस्ट ॲक्ट 2002 कलम 13 (4) अंतर्गत मधील नियम 8(6), सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या अन्वये स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री ई- लिलाव पध्दतीने करण्या संदर्भात

तमाम लोकांस व विशेषतः कर्जदार व हमीदार ज्यांचे वर्णन खालील तक्तामध्ये केले आहे त्यांना सदर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमूद स्थावर/ अस्थावर मिळकती ज्या सेक्युअर्ड क्रेडीटर यांचेकडे गहाण / ताब्यामध्ये आहेत, ज्याचा रचनात्मक / प्रत्यक्ष / प्रतिकात्मक ताबा अधिकृत अधिकारी, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर यांनी घेतला आहे. अधिकृत अधिकारी, त्यांची विक्री **"जसे आहे तसे", "जिथे आहे तिथे" व "जशी आहे" त्या स्थितीत" खालील तारखेस** कर्जदार/ गहाणदार / हमीदार यांचेकडून देय रक्कम वसूल करण्याकरीता, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर, यांचेद्वारे करण्यात येणार आहे. राखीव किंमत व अनामत रक्कम व स्थावर मिळकतीचे किमान वर्णन व त्यावर असलेला बोजा (काही असल्यास) यांची माहिती खालीलप्रमाणे

लॉट क्र.	शाखेचे नाव खात्याचे नाव कर्जदार / जामीनदाराचे नाव आणि पत्ता	मिळकतीचे वर्णन आणि कर्जदार / गहाणदार यांची नावे	अ) मागणी सूचनाकलम १३(२) प्रमाणे दिनांक ब) थकबाकी रक्कम दि. ३१.१२.२०२५ रोजी क) ताबा दिनांक कलम १३(४) सरफेसी कलम २००२ प्रमाणे अ) ताबा प्रकार सांकेतिक / प्रत्यक्ष /रचनात्मक	अ) अनामत रक्कम (रु. लाख) ब) ईएमडी (ईएमडी जमा करण्याची शेवटची तारीख) क) बोली वाढीव रक्कम	लिलावाचे दिनांक व वेळ	कर्जदारांच्या बोझाचा तपशील
१	**शाखा- पीएनबी - अकोला (०००९००) कर्जदार - मे. खुशी ट्रेडर्स प्रोप्रा. श्रीमती प्रियंका योगेश पलीवाल** पत्ता - दानापुर, ता. तेलहरा, जि. अकोला, महाराष्ट्र - ४४४ १०८ **तसेच राहणार श्रीमती प्रियंका योगेश पलीवाल** पत्ता- वार्ड नं. १३, राम मंदिर जवळ, तेलहरा जि. अकोला, महाराष्ट्र- ४४४ १०८ **जामीनदार/ तारणदार - १. सौ. सुधा ताराचंद पलीवाल** पत्ता- वार्ड नं. १३, राम मंदिर जवळ, तेलहरा जि. अकोला, महाराष्ट्र- ४४४ १०८ **२. सौ. संगिता राजेश पलिवाल** पत्ता- वार्ड नं. १३, राम मंदिर जवळ, तेलहरा जि. अकोला, महाराष्ट्र- ४४४ १०८	लेआऊट प्लॉट नं. ३५-बी, फिल्ड सर्व्हे नं. ६४/१, शिवा नगर मागे, राजेश्वर नगर, गाडेगाव रोड, गाडेगाव, ता. तेलहरा, जि. अकोला. **मालकी हक्क - श्रीमती संगिता राजेश पलीवाल क्षेत्रफळ एरिया - १४९.६५ स्क्वे.मी. (१६१०.२३ स्क्वे.फुट) अंदाजे चतुःर्सिमा - उत्तर -** लेआऊट रस्ता, **दक्षिण -** प्लॉट नं. ३५ (ए), **पुर्व -** प्लॉट नं. ३६ (ए) **पश्चिम -** लेआऊट रोड **प्रोप्रायटी आयडी - PUNB0082880031**	अ) ०१.०६.२०२४ ब) रु. १,४३,७१,५५६.२९/- + इतर व्याज क) २२.०८.२०२४ ड) सांकेतिक ताबा	अ) रु. १०.५६ लाख ब) रु. १.०५६ लाख दि. (०७.०४.२०२६) क) रु. ०.१०लाख	दि. ०७.०४.२०२६ वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत	माहित नाही
२	**शाखा- पीएनबी - अकोला मेन (०००९००) कर्जदार - मे. कृष्णा ट्रेडर्स प्रोप्रा. सुधा ताराचंद पलीवाल** पत्ता - लक्ष्मी इंडस्ट्रीज, तहसिल रोड, गाडेगाव, ता. तेलहरा, जि. अकोला- ४४४ १०८ **प्रोप्रायटर सौ. सुधा ताराचंद पलीवाल** पत्ता- वार्ड नं. १३, राम मंदिर जवळ, तेलहरा जि. अकोला, महाराष्ट्र- ४४४ १०८ **जामीनदार १. सौ. प्रियंका योगेश पलिवाल** पो. दानापुर, ता. तेलहरा, अकोला, महाराष्ट्र - ४४४१०८ **२. सौ. संगिता राजेश पलिवाल** पत्ता- वार्ड नं. १३, राम मंदिर जवळ, तेलहरा जि. अकोला, महाराष्ट्र- ४४४ १०८	१. रहिवाशी प्लॉट नं. २८ आणि २९, फिल्ड सर्व्हे नं. ७२/२ ए, मौजे गाडेगाव, लक्ष्मी ट्रेडर्सच्या बाजुला, तहसिल रोड, ता. तेलहरा, जि. अकोला **मालकी हक्क - सुधा ताराचंद पलीवाल चतुःर्सिमा - उत्तर -** प्लॉट नं. ३०, **दक्षिण -** तहसिल रोड, **पुर्व -** लक्ष्मी इंडस्ट्रीज **पश्चिम -** लेआऊट रोड **प्रोप्रायटी आयडी - PUNB1HA65110601**	अ) २२.१२.२०२२ ब) रु. १३०५६७६७.८९/- + इतर व्याज क) २३.०३.२०२३ ड) सांकेतिक ताबा	अ) रु. ४३.९५ लाख ब) रु. ४.३९५ लाख (दि. ०७.०४.२०२६) क) रु. १.०० लाख	दि. ०७.०४.२०२६ वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत	माहित नाही
३	**पीएनबी-अकोला मेन (000900) कर्जदार: मे. ओम उद्योग** प्लॉट क्र. यु-१०, एमआयडीसी फेज ४, शिवणी, ता.जि. अकोला- ४४४१०४ **प्रोप्रायटर : 1. श्री. पंकज सतीश राठी** पत्ता- जानकी कुंज, हनुमान मंदिराजवळ, आर्यभट्ट कॉलनी, गौरक्षण रोड, अकोला, तालुका आणि जिल्हा अकोला-444104 **जामीनदार / गहाणदार : 1. श्री. सतीश गोवर्धनदास राठी** पत्ता- जानकी कुंज, हनुमान मंदिराजवळ, आर्यभट्ट कॉलनी, गौरक्षण रोड, अकोला, तालुका व जिल्हा अकोला-444104. **2. मयत सरला सतीश राठी यांचे सर्व कायदेशीर वारस** पत्ता- जानकी कुंज, हनुमान मंदिराजवळ, आर्यभट्ट कॉलनी, गौरक्षण रोड, अकोला, तालुका व जिल्हा अकोला-४४४१०४.	कमर्शियल दुकान नाजुल प्लॉट नं. ९/१ (ओम ॲसिड आणि केमिकल) क्षेत्रफळ ९७४.८३ चौ.मी. म्हणजेच १०४९३ स्क्वे.फुट नाजुल स्ट्रिट क्रमांक २६अ, गुप्ता ऑइल मिलच्या मागे, मोहता मिल रोडजवळ, अकोला, ता.आणि जि.अकोला. **मालकी हक्क - मेसर्स ओम ॲसिड आणि केमिकल इंडस्ट्रीज तर्फे प्रोप. श्री. पंकज सतीश राठी चतुर्सिमा : पूर्व-** सरकारी रस्ता, **पश्चिम-** मोरणा नदी, **उत्तर-** मोहम्मद, समीउल्ला आणि इतरांची मालमत्ता, **दक्षिण-** मंदिर आणि श्री गुप्ता यांची मालमत्ता **मालमत्ता आयडी-PUNB0082880016**	अ) १९.०८.२०२० ब) रु. ३,३८,५५,१७९.७३/- + इतर व्याज क) १८.१२.२०२५ ड) प्रत्यक्ष ताबा	अ) रु. १८६.०० लाख ब) रु. १८.६ लाख (दि. ०७.०४.२०२६) क) रु. १.०० लाख	दि. ०७.०४.२०२६ वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत	माहित नाही

विक्री ही सेक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या विहित केलेल्या अटी व शर्ती खालील प्रमाणे
1. मालमत्तेची विक्री जशी आहे तशी आणि जशी आहे तशी आणि जे काही आहे ते आहे वर विक्री केली जात आहे.
2. खाली नमूद सुरक्षीत मालमत्तेची माहिती ही अधिकृत अधिकाऱ्यांच्या सर्वोत्तम माहितीनुसार नमूद केली आहे, परंतू अधिकृत अधिकारी हे त्यामध्ये असलेल्या कोणत्याही तृटीस, चुकीची माहितीस वा काही चुकल्यास उत्तर देण्यास जबाबदार राहणार नाहीत.
3. सदर विक्री ही दिनांक, 07.04.2026 @ सकाळी 11.00 ते संध्या. 4.00 वर https://baanknet.com वेबसाईटवर प्रदान केलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मव्दारे खाली दिलेल्या स्वाक्षरीकर्ताव्दारे केली जाईल
4. ई-लिलावात सहभागी होण्यासाठी बोलीदाराने राखीव किंमतीपेक्षा किमान एक बोली अनिवार्यपणे सादर करणे आवश्यक आहे.
5. विक्रीच्या तपशीलावर अटी व नियमांसाठी कृपया www.pnb.bank.in. आणि https://baanknet.com ही वेबसाईट पाहावी

दिनांक - २०.०३.२०२६
स्थळ - नाशिक

टीप : स्वैर भाषांतर; तफावत आढळल्यास मूळ इंग्रजी मजकूर ग्राह्य

स्वाक्षरी/-
श्री. वेंकटेश एस.
मुख्य व्यवस्थापक आणि अधिकृत अधिकारी,
पंजाब नॅशनल बँक, (सिक्युअर्ड क्रेडिटर)